क्रमांक : ११०

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### बुधवार, दिनांक ४ जुलै, २०१८ / आषाढ १३, १९४० (शके)

**११० :: स्थगन प्रस्तावाच्या सूचना ::**

१. महाराष्ट्र विधानसभेच्या बुधवार, दिनांक ४ जुलै, २०१८ पासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होणाऱ्या सन २०१८ च्या व्दितीय (पावसाळी) अधिवेशनासाठी दयावयाच्या स्थगन प्रस्तावाच्या सूचना दिनांक ५ जुलै, २०१८ रोजीपासून महाराष्ट्र विधानसभा सभागृहाचे नियमित बैठकीच्या २ तास आधीपासून AMOIS या आज्ञावली (WEB PORTAL) द्वारे Online पध्दतीने तसेच प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालयात Offline पध्दतीने स्वीकारण्यात येतील.

२. AMOIS या आज्ञावलीद्वारे Online पध्दतीने तसेच प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानसभा यांच्या कार्यालयात स्थगन प्रस्तावाच्या सूचना विधानसभा सभागृहाचे नियमित बैठकीच्या १ तास पूर्वीपर्यंत स्वीकारण्यात येतील.

३. महाराष्ट्र विधानसभा नियम ९७ अन्वये स्थगन प्रस्तावाच्या सूचनेचा विषय हा निकडीच्या सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद असणे आवश्यक आहे. Offline स्थगन प्रस्तावाच्या सूचना देताना सदस्यांनी त्या आपल्या लेटरहेडवर ३ प्रतीत सादर कराव्यात.

४. Offline स्थगन प्रस्तावाच्या सूचनेवर एका पेक्षा जास्त सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असतील तर कृपया स्वाक्षरीच्या खाली सदस्यांनी आपले नाव व नावांचा क्रम स्पष्टपणे नमूद करावा.

५. Offline स्थगन प्रस्तावाच्या सूचना या सदस्य किंवा सदस्यांचे अधिकृत स्वीय सहायक अथवा संबंधित विधिमंडळ पक्ष कार्यालयातील अधिकृत ओळखपत्र असलेल्या कर्मचाऱ्यांकडून स्वीकारण्यात येतील. अन्य खाजगी व्यक्तींमार्फत सदस्यांनी पाठविलेल्या सूचना तसेच, सन्माननीय सदस्यांच्या लेटरहेड व्यतिरिक्त अन्य कोणत्याही स्वरुपातील स्थगन प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाहीत व विचारात देखील घेतल्या जाणार नाहीत याची कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी नोंद घेऊन आवश्यक सहकार्य करावे.

६. स्थगन प्रस्तावाच्या सूचना स्विकृती संबंधी व स्विकृत सूचना चर्चेला घेणेसंबंधीचा पूर्ण अधिकार मा.अध्यक्षांचा राहील.

**विधान भवन,**
**नागपूर,**
**दिनांक : ४ जुलै, २०१८**

**डॉ.अनंत कळसे,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
६) संगणक कक्ष (WEBSITE)
७) एम.के.सी.एल. प्रशिक्षण विभाग.